स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विद्याशाखा अंतर्गत मराठी विषयातील

पीएच.डी पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधन विषय

"आदिवासींची निवडक आत्मकथने : एक चिकित्सक अभ्यास"

संशोधक

कु.संजीवनी शिवाजी डवरे

एम ए, नेट, मराठी, एम. ए भूगोल, बी एड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजेश श्रीराम धनजकर

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड

ता. गंगाखेड जि. परभणी

"आदिवासींची निवडक आत्मकथने : एक चिकित्सक अभ्यास "

प्रस्तावना:

लेखकाचे व्यक्तिमत्व आपल्या समाजातील सभोवतीच्या घटना घडामोडींनी बनत असते. एकंदरीतच काय तर माणूस हा परिस्थितीचे अपत्य असतो आणि साहित्य, संगीत व कला ह्या मानव निर्मित असतात. एखाद्या परिस्थितीचा मानवी मनावर जसा परिणाम होतो, तसा मानवनिर्मित कलावरही होत असतो. या साऱ्यातून घेतलेल्या अनुभवांनी अस्वस्थ होऊन त्या अनुभवांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न लेखक साहित्य प्रकाराच्या माध्यमातून व्यक्त करत असतात.

तसे पाहिल्यास ग्रामीण भागातील लोकांची भाषा, संस्कृती आणि समस्या या नागरी जीवनापेक्षा वेगळ्या आहेत आणि त्यातही आदिवासींच्या संदर्भात सांगायचे झाले तर आजही अनेक वर्षानंतर बहुतांश लोक हे दरी, खोरी, जंगल- वाडी, खेडी अशा भागात वास्तव्य करत असल्याचे आपल्या निदर्शनास येते. अशा परिस्थितीत शिक्षणाचे गांभिर्य नसलेल्या आदिवासी समाजाला जगात काय चालले आहे याचे भान नसलेल्या आपल्याच रंगात आणि धुंदीत असणारा आणि वेगळ्याच विश्वात वास्तव्य करीत असलेला समाज म्हणजे आदिवासी समाज होय. अशा या आदिवासी समाजाला काही परिवर्तनाची चाहूल लागली नव्याने थोडा शिक्षणाचा गंध आणि बदलणाऱ्या परिस्थितीचे थोडेसे भान आले. शिवार व रान या पलीकडे शिकून जिद्दीने परिस्थितीला सामोरे जाऊन जीवनातील चढ-उतार, सुख दुःख पचवून, नवीन येणाऱ्या अभ्यासकासाठी साहित्य स्वरूपात उतरवली त्यात व्यक्तिगत आयुष्यातील अनेक अडचणीतून सावरत आपलं अस्तित्व निर्माण करण्याची जिद्द, चिकाटी, धाडस या साऱ्यासोबत वास्तविक स्वरूप स्वतःच्या भाषेत अनुभव सांगणारी ही प्रांजल आत्मकथने आहेत. काही निवडक आत्मकथने ती म्हणजे डॉ.राजेंद्र भारूड यांचे "मी एक स्वप्न पाहिलं!" व प्रा.डॉ राजेश श्रीराम धनजकर यांचे "अंधाच कारट", रामराजे आत्राम यांचे "उघडा दरवाजा" ही आत्मकथने केवळ

एका यक्तिची न राहता ती एका वर्गाची प्रतिनिधित्व करत आहेत आणि म्हणूनच या आत्मचरित्रपर लेखनाला सामाजिक दस्तऐवजाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. ही आत्मकथने केवळ आठवणी कथन करणारी नाहीत, तर ती आपल्या वास्तविक अनुभवांना त्या वाचकाच्या समोर आलेलं अनुभव विश्व उलगडून सांगणारी आहेत आणि या काळातील सामाजिक प्रश्नांना घेऊन निर्माण झालेली व त्या बरोबर आपण ज्या परिस्थितीत जगलो त्याचं डोळस दर्शन देणारी आत्मकथने आहेत. म्हणून मी तोच विषय म्हणजेच "आदिवासींची निवडक आत्मकथने : एक चिकित्सकअभ्यास घेण्याचे ठरविले आहे.

संशोधनाची दिशा व पद्धत

स्वातंत्र्योत्तर काळातील समाजात आमूलाग्र बदल झालेला दिसून येतो. जेव्हा परिवर्तनाचे वारे सर्वत्र वाहत होते तेव्हा कला व साहित्य यांच्या स्वरूपातही नव्या जाणिवा व्यक्त होऊ लागल्या आणि मग तेव्हा त्यात परिस्थिती आणि साहित्य परिवर्तनाची चाहूल भासू लागली तसे पाहायचे झाले तर मराठी साहित्य प्रकारात कविता, कथा, नाटक, कादंबरी, आत्मकथा, भारुड, बखर अश्या अनेक वाड:मय प्रकारांचा समावेश होत असल्याचे आपणास माहीतच आहे .पण त्यात आत्मकथा हाच प्रकार मला विशेष वाटतो.

एखादी व्यक्ती आणि प्रसंग त्या व्यक्तिचित्रांनावर दिलेला भर, त्यात एखांदा प्रसंग त्या लेखकाचे आत्मसमर्पण, तटस्थ वृत्तीने केलेलं आत्मवृत्त विश्लेषण, अवघड परिस्थितीचा सामना, आत्मनिरीक्षण त्यातून आपल्या वाट्याला आलेल्या अनुभवविश्वाची उत्कटपणे मांडणी लेखक करतो कथानायक ज्या समाजात वास्तव्य करीत आहे त्या समाजाचं चित्रण या साऱ्या गोष्टींचा आत्मकथनात केलेले प्रगटीकरण वाचकांना प्रेरित व अस्वस्थ करते, एकंदरीतच काय तर व्यक्तिचित्र डोळ्यासमोर भरभर उभे राहिल्यासारखे वाटतात. निव्वळ जीवनानुभव हे यातील कोणत्याही लेखनाचे स्वरूप नसून ते एखादी भूमिका मांडण्याच्या निमित्ताने झालेले चित्रण असे उत्कंठता पूर्वक लेखन स्वरूप आहे. स्वतःसोबत आपल्या समाजाच्या जीवन

जाणिवा रेखाटताना आपल्या निदर्शनात येतात. जो व्यक्ती आपल्या डोळ्यासमोर आहे प्रत्यक्ष दिसणाऱ्या आणि ज्वलंत परिस्थितींना सामोरे जाऊन त्या परिस्थितीतून अत्यंत कठीण व बिकट अवस्थेत असूनही आपले ध्येय साध्य करणारी जिद्दी,चिकाटी आणि कष्ट यांची साथ न सोडता सदैव धडपडणारी आणि या साऱ्यातून आपणास त्यांच्या जीवन अनुभवांचे व्यक्तिविशेष, तत्त्वज्ञान त्यांच्या आत्मकथनात चित्रित केलेले आपल्या लक्षात येते. अशी आत्मकथने अभ्यास करण्यास कोणाला आवडणार नाही. याच विचाराने प्रेरित होऊन मी त्यांचे कार्य अवलोकन करायचे ठरवले आहे.

संशोधनाचे वेगळेपण

आत्तापर्यंत मराठी आत्मकथनाची प्रेरणा, स्वरूप,आकृतिबंध यावर बरेच लेखन झाले. पण त्यात आदिवासी आत्मथनांचे प्रमाण कमी आहे आणि या आत्मकथनांनवर फारच क्वचित संशोधन झाल्याचे दिसून येईल. तर त्यात त्यांनी आपल्या आत्मकथनात सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थिती व व्यक्तिगत घटक, घटना व तत्वांचा यात स्वतंत्रपणे अभ्यास केला जाईल. त्यांच्या आत्मकथनातील कथानकाचा जीवनावर सखोल प्रकाश टाकने व त्यांच्या त्या साऱ्या गोष्टींचा परिणाम आज सामाजिक घटकांवर कसा झाला हे संदर्भासह विश्लेषण करून अभ्यास करने हे माझ्या संशोधनाचे वेगळेपण ठरणार आहे.

उद्दिष्टे

1 आदिवासी आत्मकथन या साहित्यप्रकाराची निर्मिती व प्रेरणा समजेल.

2 आदिवासी आत्मकथने ही एक साहित्यकृती म्हणून तिचे महत्व समजून घेता येईल.

3 आदिवासी आत्मकथनात आलेली लेखकाची व्यक्तिचित्रे, प्रसंग चित्रे, समाजातील व परिस्थितीतील वर्णन शैली, भाषा लक्षात घेता येतील.

4 आदिवासी आत्मकथनातील लेखकाची सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी स्पष्ट होईल.

5 आदिवासी आत्मकथनाचा आणि त्यातील कथा नायकांच्या संपूर्ण जीवन कार्याचा आढावा घेता येईल

6 आदिवासी आत्मकथनातील लेखकाच्या जीवनातील घटना- प्रसंग, लेखकाचे जीवन, तत्त्वज्ञान, समाज प्रबोधन व उपदेश समजतील.

7 आदिवासींच्या आत्मकथनाची वैशिष्ट्ये, विशेष, आशय सौंदर्य अशा विशेषांचाही यांचाही अभ्यास करता येईल.

8 एकंदरीतच काय तर आदिवासी आत्मकथनातून आदिवासींच्या प्रश्नांना आणि बदलत्या स्वरूपातील परिस्थिती, वास्तविक जीवनानूभवाचाही शोध घेतला जाईल आणि साहित्य प्रकारातून लेखकाचे मोलाचे योगदान त्या अनुषंगाने अभ्यासही केला जाईल.

9 आदिवासी आत्मकथनाचे निष्कर्ष नोंदविले जातील व गृहितके मांडली जातील.

गृहितके.

1 आदिवासी आत्मकथनातून वास्तविक जीवनावर घडलेल्या त्या अनुभव विश्वाचे चित्र आपल्यासमोर आले आहे

2 डॉ राजेंद्र भारूड, प्रा. डॉ राजेश श्रीराम धनजकर, रामराजे आत्राम यांचे साहित्यिक म्हणून योगदान मोलाचे आहे.

3 आदिवासी आत्मकथनातून आदिवासींच्या प्रश्नांचा आणि वास्तविक बदलत्या परिस्थितीचा अभ्यास केला जातो.

संशोधन पद्धती आणि साधने

संशोधन संदर्भ ग्रंथ मासिक व त्रैमासिक साधनाच्या आधारे संशोधन प्रबंध तयार केला जाईल. त्यात शंका-कुशंका निरसन व समस्या परिकल्पना तसेच साधन सामग्री व वेगवेगळ्या गोष्टी आवश्यकतेनुसार अवलोकन व संशोधनासाठी मुलाखती वस्तुनिष्ठ व्यक्तिनिष्ठ पद्धतींचा वापर करण्यात येईल. त्यासाठी संशोधनाची रूपरेषा पुढीलप्रमाणे ठरवली आहे.

संशोधनाची रूपरेखा

प्रकरणाचा आराखडा

प्रकरण १ ले

आदिवासी समाज, संस्कृती आणि साहित्य.

प्रस्तुत प्रकरणात आदिवासी म्हणजे कोण आदिवासी समुदायाच्या व्याख्या आदिवासी साहित्याची पूर्वपिटीका आदिवासी साहित्याची संकल्पना आदिवासी समाज आदिवासी संस्कृती, आदिवासी साहित्य, समाज, संस्कृतीचा स्वरूप, आदिवासी साहित्याची वैशिष्ट्य यांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण २

आदिवासी आत्मकथनाचे स्वरूप, प्रेरणा व वाटचाल.

प्रस्तुत प्रकरणात आपण आत्मकथा म्हणजे काय आत्मकथन चरित्र आत्मचरित्र या साहित्य प्रकाराचा अभ्यास करून आत्मकथनाचे स्वरूप प्रेरणा व वाटचाल यांचा आढावा घेणार आहोत

प्रकरण ३

आत्मकथनातील कथा नायकाची वाङ्मय निर्मिती.

आदिवासी आत्मकथने यात काही निवडक आणि चिकित्सक आत्मकथन घेतली आहेत त्यात डॉक्टर राजेंद्र भारूड डॉक्टर राजेश धनजकर राजाराम आत्राम यांची आत्मकथने मी घेतली आहेत त्यात या आत्मकथनाच्या अनुषंगाने कथनायकांचे वास्तविक जीवन अनुभव आणि त्या अनुभवांचा चित्राआलेख यांचे प्रस्तुत सादरीकरण   कथानायकाने आपल्या आत्मकथनाच्या सहाय्याने कसं उतरवला आहे आत्मकथन लिहिण्याची प्रेरणा कथानायकाला कुठून व कशी मिळाली? तसेच या आत्मकथनांचा स्वरूप, वैशिष्ट्य आपण प्रकरणाच्या माध्यमातून अभ्यासण्याचे प्रयत्न करणार पाहणार आहोत.

प्रकरण ४

आदिवासी आत्मकथनातील भाषाशैलीचा आविष्कार.

आदिवासींची काही निवडक आत्मकथने त्यात कथनायकाचे आत्मकथनाची निर्मिती करत असताना वापरण्यात आलेली भाषाशैली, भाषेचे स्वरूप, भाषेचे वैशिष्ट्य आणि भाषेचे वैविध्य विविधता आपण पाहणार आहोत. भाषा सहज सुगम आहे का? आत्मकथनात बोली भाषेचा वापर भाषाशैलीचे आणखी नवीन काही अविष्कार आपल्याला या आत्मकथनाच्या सहाय्याने पाहावयास मिळतील का याचा आढावा आपण प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून घेणार आहोत.

प्रकरण ५

आदिवासी आत्मकथनांचे आशय व अभिव्यक्ती.

या प्रकरणात आदिवासींची निवडक आत्मकथने त्यांचा आशय सारांश व अभिव्यक्ती व्यक्त करण्यासाठी आत्मकथनायकाचे मनोगत मुलाखत किंवा प्रश्नावली स्वरूपात प्रत्यक्ष भेट घेऊन माहितीचे संकलन केलं जाईल.

प्रकरण ६

उपसंहार व निष्कर्ष.

प्रस्तुत प्रकरणांमध्ये आदिवासींची काही निवडक आत्मकथन एक चिकित्सक अभ्यास या विषयाच्या अनुषंगाने आत्मकथन आणि आत्मकथनातील सामाजिक व वास्तविक कार्याचा आढावा घेऊन निष्कर्ष मांडण्यात येईल.

संदर्भसूची

१) डॉ तुमराम विनायक 'आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

२)अ. म. जोशी 'चरित्र आत्मचरित्र तंत्र आणि इतिहास' स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे एप्रिल 1965

३) डॉ. जाधव सुदाम 'आदिवासी साहित्य' सुलभा प्रकाशन, प्रतापगड औरंगाबाद 13 सप्टेंबर 1999

४) डॉ. पाटील हेमंत 'संशोधन पद्धती प्री एचडी कोर्स' अथर्व पब्लिकेशन जळगाव.

५) डॉ. पाटील वा भा 'संशोधन पद्धती' प्रशांत पब्लिकेशन जळगाव 2006

६) प्रा. पाटील व्ही बी 'संशोधन पद्धती' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

७) वसंत रामचंद्र बोरगावकर 'प्राचीन मराठीतील चित्रलेखन' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

८) ग. का रावते ‘मराठी चरित्र मुलतत्वे व समीक्षा’ समर्‌थ प्रकाशन, मुंबई

९) सदा कऱ्हाडे ‘चरित्र आणि आत्मचरित्र’ लोकवांङःमय बृहन्मुंबई मुंबई.

१०) डॉ गीता मांजरेकर ‘चरित्रात्मक नाटक संकल्पना आणि समीक्षा’ डिंपल पब्लिकेशन,ठाणे

११) आनंद यादव ‘आत्मचरित्र मीमांसा’ मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे

१२) द. न. गोखले ‘चरित्र चिटक’ पद्मगंधा प्रकाशन, पुणे

१३) द .न. गोखले ‘एका चरित्राचे चरित्र झोपलेल्या’ मौज प्रकाशन, बृहन मुंबई

संशोधक

कु.संजीवनी शिवाजी डवरे

एम ए, नेट, मराठी, एम. ए भूगोल, बी एड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजेश श्रीराम धनजकर

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

ता. गंगाखेड जि. परभणी